महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग मागे,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- दिनांक :-


माहिती अधिकार

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.०५.१२.२०१९

१. अपिलकर्ता श्री अशोक संपतराव रणदिवे,
राहणार :- स.नं.६४९/२, खडके वस्ती,
अप्पर बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता,कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

श्री अशोक संपतराव रणदिवे
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री अशोक संपतराव रणदिवे यांनी दिनांक ०७/०९/२०१९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांचेकडे सन २०१७-२०१९ या वर्षामधील कंत्राटी सफाई कामगारांची माहिती मिळणेकामी अर्ज केला होता.

अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे अंदाजे ३१२ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/- रुपये प्रमाणे एकूण ६२४/- रु. रक्कमेचा भरणा केलेनंतर माहिती उपलब्ध करून दिली जाईल असे पत्र जा.क्र.२२६५ दि.११/०९/२०१९ अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले. तद्नंतर अर्जदाराने दि.१९/०९/२०१९ रोजी उपलब्ध फाईल टें.क्र.२०-२०१७ तपासून सदर फाईल मधील अतिरिक्त ४५५ पृष्ठांची मागणी केली असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले. दि.१६/१०/२०१९ रोजी र.रू. १५३४/- किंमतीचा भरणा केलेनंतर अर्जदारास एकूण ७६७ पृष्ठ्ये उपलब्ध करून देणेत आले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ०७/०९/२०१९ | ०६/१०/२०१९ | ११/०९/२०१९ | १६/१०/२०१९ | ०१/११/२०१९ |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे – अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ३०/११/२०१९ | १६/११/२०१९ | होय | – | ३०/११/२०१९ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :– दि. ०५/१२/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता.

सुनावणीस अपिलकर्ता :– उपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :– उपस्थित

- जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | सन २०१७–२०१९ या वर्षामधील कंत्राटी सफाई कामगारांची माहिती मिळणेकामी अर्ज केला होता. | कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे अंदाजे ३१२ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/– रुपये प्रमाणे एकूण ६२४/– रु. रक्कमेचा भरणा केलेनंतर माहिती उपलब्ध करून दिली जाईल असे पत्र जा.क्र.२२६५ दि.११/०९/२०१९ अन्वये कळविले. तद्नंतर अर्जदाराने दि.१९/०९/२०१९ रोजी उपलब्ध फाईल टें.क्र.२०–२०१७ तपासून सदर फाईल मधील अतिरिक्त ४५५ पृष्ठांची मागणी केली. दि.१६/१०/२०१९ रोजी र.रू. १५३४/– किंमतीचा भरणा केलेनंतर अर्जदारास एकूण ७६७ पृष्ठ्ये उपलब्ध करून देणेत आले. |

## विवेचन

जुलै व ऑगस्ट २०१७ रोजीची कंत्राटी सफाई कामगारांची यादी, EASI, PF मिळालेचे अर्जदार यांनी सांगितले. परंतु सन २०१७-२०१९ रोजीची संपूर्ण माहिती मिळाले नसलेचे अपिलकर्ता यांनी सांगितले.

कार्यालयाकडे उपलब्ध फाईल टेंडर क्र.२०-२०१७ ची संपूर्ण माहिती अर्जदारास देणेत आलेली असल्याचे मा.जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी सांगितले. तसचे उर्वरीत माहितीची फाईल मुख्य लेखा व वित्त विभागाकडे अंतिम बिलासाठी दिलेल्या असलेने सदर माहिती देणे अडचणीचे आहे. सदर फाईल कार्यालयाकडे प्राप्त झालेनंतर माहिती देणे शक्य होणार असलेचे मा.जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी सांगितले.

## -: आदेश :-

सन २०१७-१९ अखेर मुख्य लेखा व वित्त विभागाकडील फाईल प्राप्त करून अपिलार्थी यांना आवश्यक ती माहिती १५ दिवसांचे आत आवश्यक ते शुल्क आकारून अपिलार्थी यांना उपलब्ध करून देणेत यावी.

तसेच टे.क्र.२०-२०१७ चे फाईल मधील मा. कामगार अधिकारी यांचे मान्यतेचा किमान वेतनाबाबतचा अभिलेख अपिलार्थी यांना त्वरीत विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावा.

सबब, प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

(रविंद्र थोरपडे)
अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त,
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

दिनांक आणि ठिकाणः ०५/१२/२०१९, पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-१. अपिलकर्ता श्री अशोक संपतराव रणदिवे,
राहणार :- स.नं.६४९/२, खडके वस्ती,
अप्पर बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

२. श्री अनिल सोनवणे,
जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......